<u>अतारांकित प्रश्नोत्तरांची सहावी यादी</u>

# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**हुतात्मा भाई कोतवाल यांच्या स्मारकाच्या दुरावस्थेबाबत**

**(१) २७४६ (१०-०४-२०१५). श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड, (जि.ठाणे) तालुक्यातील सिध्दगडाच्या पायथ्याशी बोरवाडी येथे असलेल्या हुतात्मा भाई कोतवाल स्मारकाची दुर्दशी झालेली असून, सदर बलिदानास ७० वर्षे उलटून गेल्यानंतरही स्मारकापर्यंत जाण्यास नीट डांबरी रस्ताही बांधण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) मुरबाड, कर्जत, शहापूर, बदलापूर, अंबरनाथ, कल्याण या तालुक्यातून प्रतीवर्षी २ जानेवारीला क्रांतीज्योतीसाठी येणारे देशप्रेमी नागरीक व शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शासनाच्या अनास्थेमुळे अनेक अडचणींचा सामना करीत जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या स्मारकाच्या ठिकाणी देशभक्त नागरीक, विद्यार्थी यांना जाता यावे व त्यांच्या बलीदानातून स्फुर्ती मिळेल अशा पध्दतीने सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. सदर क्षेत्र भिमाशंकर अभयारण्य-२ वन्यजीव विभाग, पुणे यांचे अधिनस्त असून सदर वनक्षेत्रामध्ये केंद्र शासनाच्या परवानगी शिवाय डांबरी रस्ता होऊ शकत नाही, असे वनपरिक्षेत्र अधिकारी, भिमाशंकर, अभयारण्य-२ यांनी कळविले आहे.

(३) राज्यातील ग्रामीण क्षेत्रात थोर व्यक्तींची स्मारके उभारण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १२ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयानुसार मार्गदर्शक तत्वे विहीत केली आहेत. त्या अनुषंगाने राज्यातील ग्रामीण क्षेत्रात थोर व्यक्तींची स्मारके उभारणेबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या मार्गदर्शक तत्वानुसार स्मारके उभारणे/दुरुस्ती करणे या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. या अनुषंगाने विभागाचे धोरण विहीत करण्याचे प्रस्तावित आहे. सदर धोरण अंतिम झाल्यानंतर सदर स्मारकाच्या ठिकाणी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

---

**शालेय शिक्षण विभागाचा दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ चा शासन निर्णय आदिवासी विभागाला लागू करण्याबाबत**

**(२) ६१३४ (२३-०४-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाचा बी.ए, बी.एङ पदवीधारक अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करण्यासंबंधीचा दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ चा शासन निर्णय आदिवासी विभागास लागू करण्यासंबंधीचे प्रकरण मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे न्यायप्रविष्ट आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ चा शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय आदिवासी विकास विभागाला लागू करणेसंबंधीच्या प्रकरणी मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचेकडून अंतिम सुनावणी होऊन आदेश पारीत करण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०७-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) प्राथमिक शाळांमधील बी.एड अर्हताधारक शिक्षकांना प्रशिक्षित समजून त्यांना डी.एड ची वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास दिनांक १५/१०/२०१५ रोजी सादर करण्यात आला होता. वित्त विभागाने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणेची कार्यवाही सुरु आहे.

---

**वनजमिनीवर झालेली अतिक्रमणे**

**(३) ८४१४ (३१-०७-२०१५). श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००८ पासून वन हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या कायद्याच्या लाभापासून वनक्षेत्रातील आदिवासी वंचित राहिले आणि अतिक्रमणधारकांनी मोठ्या प्रमाणावर वन जमिनी बळकावल्याची माहिती निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वनजमिनीवर अतिक्रमणे करण्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (३१-०३-२०१६)** :(१) होय.

(२) नाही.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अन्वये मुख्यत्वेकरून वनात राहणारे व उपजिविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजांसाठी वनावर किंवा वन जमिनीवर अवलंबून असणारे व दिनांक १३ डिसेंबर, २००५ पूर्वी वनात राहणारे अनुसूचित जमाती व त्यापूर्वी किमान ३ पिढयांपासून (७५ वर्षे) वनात राहणारे इतर पारंपारिक वननिवासी यांनाच वनहक्क दावे मंजूर करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय अनुदानित आश्रमशाळेतील प्रलंबित मागण्यांबाबत

**(४) ९८८० (२९-०७-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय अनुदानित आश्रमशाळेतील कर्मचा-यांना सरसकट वरिष्ठ व निवडश्रेणी मिळावी इ.प्रलंबित प्रश्न व समस्यांचे निराकरण व्हावे, म्हणून लोकप्रतिनिधी (नाशिक) यांनी मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे दिनांक ८ नोव्हेंबर, २०१४ रोजी पत्राद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त मागण्यांबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२१-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासन पत्र क्र. विपआ-२०१५/ प्र.क्र.४५/का.११ दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ अन्वये सर्व अपर आयुक्त व प्रकल्प कार्यालये यांना राज्यात अनुदानित आश्रमशाळात कार्यरत कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक प्रकल्पनिहाय देण्यात येत असल्याने अन्य प्रकल्पात बदली झालेल्या कर्मचाऱ्यांस सदरचे क्रमांक पुन्हा पुन्हा बदलण्यास भाग पडून प्रशासकीय व आर्थिक अडचणी उद्‌भवू नये, यासाठी अनुदानित आश्रमशाळेत कार्यरत कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक अपर आयुक्त निहाय देण्यात यावेत व संबंधित कर्मचाऱ्यांची अन्य अपर आयुक्त क्षेत्रात बदली झाल्यास मागील क्रमांकच पुढे चालु ठेवावेत, अशा सूचना दिल्या आहेत.

आदिवासी विकास विभागाच्या राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धांना क्रिडा राज्यस्तरीय स्पर्धांचा दर्जा देण्यात आलेला असून आदिवासी विकास विभागाने आयोजित केलेल्या शालेय क्रिडा स्पर्धांमध्ये सहभागी होणारे खेळाडु २५ वाढीव क्रिडा गुण सवलतीसाठी तसेच सदर स्पर्धेमध्ये पदक प्राप्त करणारे खेळाडू शासन सेवेत खेळाडूंना नोकरीसाठी ठेवलेल्या ५ टक्के आरक्षणाच्या सवलतीसाठी पात्र ठरतील, असा शासन निर्णय निर्गमित केला आहे.

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. अंनिओ-२०१२/प्र.क्र.१३/का.११ दिनांक २२ नोव्हेंबर, २०१२ अन्वये आदिवासी विकास विभागातील स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळेतील १०० टक्के अनुदानित पदांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आलेली आहे त्यानुसार प्रकल्प निहाय कर्मचाऱ्यांची अंशदानाची रक्कम कपात करण्यात आलेली असून संबंधित अपर आयुक्त स्तरावर सदरची माहिती संकलीत करून ठेवण्यात आली आहे.

शासकीय/अनुदानित आश्रमशाळा येथील कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोगानुसार १५ टक्के दराने प्रोत्साहन भत्ता अदा केला जातो. तो ६ व्या वेतन आयोगानुसार कमाल मर्यादा ७०००/- रू. देण्याबाबतचा निर्णय झालेला नाही.

शासकीय/ अनुदानित आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देण्यात येते ती सरसकट वरिष्ठ व निवडश्रेणी लागु असलेल्या कर्मचाऱ्यांना पुढील टप्पा गृहीत धरून देण्याची बाब विचाराधीन आहे.

शिक्षण व वसतिगृह विभाग वेगळा करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील भ्रष्ट व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(५) ११९८७ (२१-१२-२०१५). प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील महसूल विभागात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झालेल्या तसेच विभागीय चौकशीत दोषी ठरलेल्या व निलंबित झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर किरकोळ कारवाई करुन त्यांना सेवेत पुन:स्थापित केल्यानंतर पदोन्नती देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील १० वर्षात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत किती व कोणते अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल झाले आहेत तसेच विभागीय चौकशीत किती व कोणत्या अधिकारी व कर्मचारी यांना दोषी ठरविण्यात आले व नंतर किरकोळ कारवाई करुन कार्यकारी पद वा पदोन्नती देण्यात आली,

(३) असल्यास, सदर भ्रष्ट वा दोषी अधिकाऱ्यांना पुन:स्थापित करुन पदोन्नती देण्यामागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, अशा प्रकारे भ्रष्ट व दोषी अधिकाऱ्यांना पदोन्नती दिल्याने तसेच कार्यकारी पदावर पुन:स्थापित केल्याने प्राथमिकपणाने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य खच्चीकरण होत असल्याने उक्त भ्रष्ट कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच त्यांच्यावर किरकोळ कारवाई करुन त्यांना पाठीशी धरणा-या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०७-२०१६) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुण्यात कालवा समितीची बैठक घेण्यात आल्याबाबत

**(६) १२३५३ (२२-१२-२०१५). श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यात माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान कालवा समितीची बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत कोणकोणते निर्णय घेण्यात आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०७-२०१६) :** (१) होय, कालवा सल्लागार समितीची बैठक दिनांक २२ ऑगस्ट, २०१५ रोजी संपन्न झाली आहे.

(२) सदर बैठकीमध्ये घेण्यात आलेले निर्णय व त्यानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | बैठकीमध्ये घेण्यात आलेले निर्णय | विभागामार्फत करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|
| १. | सद्यस्थितीत खरीप हंगामामध्ये हाती आलेली पिके वाया जाऊ नये म्हणुन खरीपचे आवर्तन देण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच खडकवासला प्रणालीमध्ये उर्वरित आवर्तन पूर्ण करण्यासाठी १.०० टी.एम.सी. पाणी वापर करून आठ दिवसांमध्ये आवर्तन पुर्ण करावे. | खरीपातील आवर्तन पूर्ण करण्यात आले आहे. |
| २. | चासकमान प्रकल्पाच्या चालू खरीप आवर्तनासाठी यापुढे १.५० टि.एम.सी. पाणी वापर होणार आहे. सदरील आवर्तन काटेकोरपणे पाण्याचे नियंत्रण करून पुर्ण करण्यात यावे. | खरीपातील आवर्तन पूर्ण करण्यात आले आहे. |
| ३. | आवर्तन चालू असतांना अनधिकृत पाणी उपश्यावर कारवाई करावी. सदरील कारवाई करण्यासाठी पोलीस खाते, विद्युत मंडळ व जलसंपदा विभाग यांनी संयुक्तरित्या कारवाई करावी. जलसंपदा खात्याने अनधिकृत उपसा बंद करण्यासाठी भरारी पथक नेमावे. | भरारी पथकाची नेमणूक जिल्हाधिकारी, पुणे यांनी केलेली आहे. |
| ४. | मुंढवा जॅकवेल सुरू करण्याची चाचणी (Trial) घेण्यात यावी. | पुणे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या मुंढवा जॅकवेल सुरू करण्याची चाचणी (Trial) दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ रोजी घेण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ५. | पावसाळयाचा काही कालावधी बाकी आहे त्यामुळे तुर्तास पुणे शहराच्या प्रचलित वापरात (१२५० एम.एल.डी.) पाणी कपात करण्यात येऊ नये. १५ दिवसांनी पुनश्च: विचार करण्यात येईल. | सदरच्या निर्णयानुसार खडकवासला प्रकल्पातून पुणे शहर पाणी पुरवठ्यामध्ये कोणतीही कपात करण्यात आली नाही. तथापि पुणे महानगरपालिकेमार्फत दिनांक ८/९/२०१५ पासून शहर पाणी पुरवठ्यामध्ये कपात करण्यात येऊन एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे. |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतकरी आत्महत्यांमागील मानसिक कारणे शोधण्यासाठी शासनाने कंत्राटी पध्दतीने मानसोपचारतज्ज्ञांची नियुक्ती करण्याबाबत**

**(७) १२८९६ (२२-१२-२०१५). श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकरी आत्महत्यांमागील मानसिक कारणे शोधण्यासाठी कंत्राटी पध्दतीने मानसोपचारतज्ज्ञांची नियुक्ती करण्याचा निर्णय सार्वजनिक आरोग्य मंत्री महोदयांनी घेतल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५/०७/२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यातील मराठवाडा व विदर्भातील औरंगाबाद, जालना, हिंगोली, बीड, नांदेड, लातुर, अकोला, यवतमाळ, वाशिम, परभणी, उस्मानाबाद, अमरावती, बुलढाणा व वर्धा अशा एकूण १४ जिल्हयांमध्ये सर्व शेतकऱ्यांना शाश्वत आरोग्य सेवा व समुपदेशन देण्यासाठी प्रेरणा प्रकल्प सुरु करण्यात आला आहे.

पाच जिल्हयात जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत तीन मानसोपचार तज्ञांची कंत्राटी पदे भरलेली आहेत. तसेच प्रेरणा प्रकल्प कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कंत्राटी पध्दतीवर एकूण ९ पदांपैकी समुपदेशनतज्ञांची (मानसोपचारतज्ञांची) ०५ पदे भरण्यात आली आहेत व उर्वरीत ०४ पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बालेवाडी (ता.औंध, जि.पुणे) येथील वाणेर फाटयाजवळी वृक्ष तोड थांबविण्याबाबत**

**(८) १४२६६ (०५-०५-२०११). डॉ. सुधीर तांबे:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालेवाडी (ता.औंध, जि.पुणे) येथील वाणेर फाटयाजवळ मोठया प्रमाणात अवैध वृक्ष तोड करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच पुढे भविष्यात अशाप्रकारे वृक्ष तोड थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.

पुणे महानगरपालिकेमार्फत स.नं.१२६/१, बाणेर, पुणे येथील जागेची दिनांक १८ डिसेंबर, २०१० रोजी पाहणी केली असता, एकूण ३५ वृक्ष अनधिकृतपणे तोडले असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) व (३) होय.

संबंधितांना महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ मधील तरतुदीनुसार दिनांक २७ जानेवारी, २०११ रोजी नोटीस पाठविण्यात आलेली होती.

सदरहू प्रकरणी मे. ज्युडिशिअल मॅजेस्ट्रेट वर्ग १, पुणे महानगरपालिका न्यायालय येथे दावा क्र. आरसीसी/२९/२०११ दाखल करण्यात आलेला असून, सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिकमध्ये मेट्रो रेल्वे किंवा बीआरटीएस प्रणाली योजना अंमलात आणणेबाबत**

**(९) १४३९८ (२३-०२-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील वाहनांची वाढती संख्या, वाहतुक कोंडी, पार्किंग, प्रदुषण, वेळ आणि पैशांचा अपव्यय या सर्वांवर परिणामकारक उपाय म्हणून मेट्रो रेल्वे किंवा बीआरटीएस हा सक्षम उपाय असल्याचे आयडीडीपी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार दिनांक ९ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराचा झपाटयाने होत असलेला विस्तार, वाढीव लोकसंख्येचा भार सहन करण्यास सद्याचे रस्ते आणि वाहतुक व्यवस्था अपुरी ठरत असल्याने तसेच भविष्यात ही समस्या अधिकच तीव्र होणार असल्याने सक्षम वाहतुक व्यवस्था उभी करण्याची आवश्यकता शासनाचे निदर्शनास आली आहे काय,

(३) असल्यास, सक्षम वाहतुक व्यवस्थेअंतर्गत वाहतुकीची कोंडी कमी करुन परिवहन व्यवस्था गतीमान करण्यासाठी सर्वोत्तम पर्याय म्हणून मेट्रो वा बस रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम (बीआरटीएस) ही प्रणाली कार्यान्वित करण्यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे ,

(४) सुधारीत विकास आराखडयातील तरतुदीनुसार नाशिक शहराचा सर्वकष वाहतुक आराखडा तयार करण्याचे अनुषंगाने नाशिक महानगरपालिका क्षेत्राची सुधारित विकास योजना तयार करण्याची प्रगतीपथावर असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली,

(५) सुधारित विकास योजनेचा प्रारुप आराखडा अद्याप जाहिर झाला नसल्यास, उक्त कार्यवाही केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(६) नाशिक महानगरातील वारंवार होणारी वाहतुक कोंडीची समस्या दुर व्हावी, म्हणून बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलाचे नियोजन चुकल्याने ह्या समस्येत घट होण्याऐवजी वाहतुक कोंडीचे प्रमाण प्रचंड वाढून, अपघातांच्या संख्येतही वाढ झाल्याने मेट्रो रेल्वे वा बीआरटीएस प्रणालीची आवश्यकता शासनाचे निदर्शनास आली आहे काय,

(७) असल्यास, वाहतुक कोंडीच्या समस्येने त्रस्त नाशिककरांना दिलासा देण्याचे दृष्टीने याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :** (१) (२) व (३)

प्राथमिक अभ्यासानुसार आय.टी.डी.पी. यांनी बी.आर.टी.एस. पर्याय सुचविला आहे. नाशिक शहराचा वाढता विस्तार विचारात घेऊन सक्षम वाहतुक व्यवस्था उभी करण्याच्या दृष्टीकोनातून सर्वंकष वाहतुक आराखडा करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली. याकरीता महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन अर्बन मास ट्रांन्सीट कंपनी लि., नवी दिल्ली यांची नेमणूक करण्यात आली. सदर संस्थेमार्फत सर्वंकष वाहतुक आराखडा तयार झाल्यानंतर वाहतुक व्यवस्थेसाठी सुचविण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत सक्षम स्तरावर पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) व (५) नाशिक महानगरपालिका क्षेत्राची सुधारित विकास योजना तयार करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(६) व (७) नाशिक शहरासाठी सर्वंकष वाहतूक आराखडा तयार झाल्यानंतर वाहतुक व्यवस्थेबाबतच्या सुयोग्य पर्यायबद्दल कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

---

### राज्यातील नाशिक शहरात बीपीओ उद्योग स्थापन करण्यास होत असलेला विलंब

**(१०) १४४०५ (२३-१२-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नाशिक यासारख्या शहरात तसेच ग्रामीण व निमशहरी भागात बिजनेस प्रोसेस आऊट सोर्सिंग (बी.पी.ओ.) उद्योगांची स्थापना करणे शक्य व्हावे, याअनुषंगाने राज्यात नवीन माहिती तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा धोरण -२०१५ च्या आखणीची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त धोरणाचा प्रारुप मसुदा तयार करण्यात येऊन, विविध विभागाकडून मागविण्यात आलेले अभिप्राय शासनास प्राप्त झाले आहेत काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला, धोरणाचे व प्राप्त अभिप्रायांचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, सदरील कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. सुभाष देसाई (१०-०३-२०१६) :** (१) होय.
(२) होय.

विविध विभागाचे मागविण्यात आलेले अभिप्राय व त्यावरील उद्योग विभागाचे अभिप्राय याची पडताळणी करून, त्याअनुषंगाने धोरणामध्ये समउचित सुधारणा करून, महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०१५, शासन निर्णय क्र. आयटीपी-२०१३/ प्र.क्र.२६५/उद्योग-२, दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी जाहीर करण्यात आले.
(३) नवीन माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०१५ मध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

- माहिती तंत्रज्ञान उद्यानांसाठी तरतूदी आणि प्रोत्साहने.
- माहिती तंत्रज्ञान घटकांसाठी तरतूदी आणि प्रोत्साहने.
- ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग आणि कॉमिक्स (ए.व्ही.जी.सी.) या क्षेत्राचा विकास.
  ग्रामीण व निमशहरी भागात बिझनेस प्रोसेस आऊट सोर्सिंग (बी.पी.ओ.) उपक्रमांचे प्रवर्तन इनक्युबेशन सेवेचा विकास.
- हरित माहिती तंत्रज्ञानाचा विकास.
- माहिती तंत्रज्ञान व्यवसाय करण्यास सुलभीकरणासाठी कायद्यातील बदल.
- मनुष्यबळ विकास.
- प्रशासकीय योजना.

ग्रामीण आणि निमशहरी भागात बिझनेस प्रोसेस आऊट सोर्सिंग (बीपीओज) या उपक्रमांचे वाढीस उद्युक्त करणे. हे धोरण माहिती तंत्रज्ञानाचा वापर, राज्याचा सामाजिक आणि आर्थिक विकास करण्यासाठी साधन म्हणून कार्य करेल. तसेच अस्तित्वात असलेल्या बिझनेस प्रोसेस आऊटसोर्सिंग घटकांना/उद्योजकांना ग्रामीण व निमशहरी क्षेत्रात त्यांच्या शाखा उभारण्यासाठी प्रोत्साहीत करेल.
(५) लागू नाही.

---

## महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट (रजिस्ट्रेशन ॲड रेग्युलेशन्स) ॲक्टचे कायद्यात रुपांतर करण्याबाबत

**(११) १४६४८ (०२-०५-२०१६). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे :** तारांकित प्रश्न क्रमांक ६९६७ ला दिनांक २८ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खासगी रुग्णालयात रुग्णांकडून घेण्यात येत असलेली अवास्तव बिले ही सर्वसामान्य रुग्णांना परवडणारी नसल्यामुळे त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट (रजिस्ट्रेशन ॲड रेग्युलेशन्स) ॲक्ट, २०१४ चा मसुदा तयार केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मसुद्याचे कायद्यात रुपांतर करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मसुद्याचे कायद्यात रुपांतर होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१६) :** (१) व (२) होय.
(३) सदर कायद्याचे प्रारुप मा.मंत्रीमंडळासमोर सादर करण्यासाठीचा प्रस्ताव वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची पूर्तता करुन सदर नस्ती वित्त विभागास पुन्हा सादर करण्यात आली आहे.

---

**हेटवणे (ता.पेण, जि.रायगड) धरणातील आरक्षित पाण्याबाबत**

**(१२) १४९२० (०२-०५-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हेटवणे (ता.पेण, जि.रायगड) परिसरात रुपये ८६ कोटी ३५ लाख खर्च करून पाटबंधारे विभागाने सिडकोच्या सहकार्याने धरण बांधले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरणाची पाणी साठवण्याची क्षमता किती दशलक्ष घनमीटर आहे, तसेच सदर धरणातून सिडकोला दरवर्षी किती एम. एल. डी. पाणी आरक्षित केले जाते,
(३) असल्यास, सिडकोला अपेक्षित पाणी पुरवठा होऊन धरणात किती एम. एल डी. पाणी शिल्लक राहत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०७-२०१६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

हेटवणे मध्यम प्रकल्पाच्या धरणाचे काम सन २००८ मध्ये पूर्ण झाले आहे. धरण कामावर रू.३१४.२२ कोटी खर्च झाला आहे.

सिडको नवी मुंबईने धरणाचे भांडवली खर्चापोटी रू. ४७.०० कोटी व सिंचन पुन:स्थापनेपोटी रू. १३९.८६ कोटी असे एकूण रू.१८६.८६ कोटी कोकण पाटबंधारे विकास महामंडळाकडे जमा केलेले आहेत.

(२) हेटवणे धरणाची पाणी साठविण्याची क्षमता १४७.४९ दलघमी असून, उपयुक्त पाणीसाठा १४४.९८ दलघमी इतका आहे. सिडको नवी मुंबई करीता ५८.१० दलघमी (१५० एम.एल.डी.) इतक्या पाण्याचे आरक्षण मंजूर करण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत सिडको नवी मुंबई करीता वार्षिक ३९.०० दलघमी (१०० एम.एल.डी.) इतक्या घरगुती वापरासाठी पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) सद्यस्थितीत सिडको नवी मुंबई करीता वार्षिक ३९.०० दलघमी (१०० एम.एल.डी.) इतक्या घरगुती वापरासाठी पाणी पूरवठा करून धरणात बाष्पीभवन व्यय व इतर पाणी वापर वगळून सिंचनासाठी ७९.०६५ दलघमी (अंदाजित २१६ एम.एल.डी.) इतका पाणीसाठा शिल्लक राहतो.

---

**अपर जिल्हाधिकारी संवर्गातील प्रलंबित पदोन्नत्यांबाबत**

**(१३) १४९५७ (२९-०४-२०१६). श्री.जयवंतराव जाधव, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या पदोन्नती समितीची बैठक आयोजित करून अपर जिल्हाधिकारी संवर्गातील पदावरील प्रलंबित पदोन्नत्यांबाबत कार्यवाही करण्याचे माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.मंत्री, महसूल यांनी मुख्य सचिवांना लेखी पत्राद्वारे निर्देश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) I) अपर जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गात पदोन्नती देवून पदस्थापना देण्याबाबतचे आदेश दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

II) निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना मंडळ क्र.२) यांना सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने आस्थापना मंडळ क्र.२ ने शिफारस केलेल्या अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देवून पदस्थापना देण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संपूर्ण राज्यातील बंद उद्योग घटकांची नविन उद्योजकांस विक्री करुन त्यांचे नावे हस्तांतरण करणेबाबत**

**(१४) १५०११ (२७-०४-२०१६). डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संपूर्ण राज्यातील बंद उद्योग घटकांची नविन उद्योजकांस विक्री करुन त्यांचे नावे हस्तांतरण करणेसाठी प्रचलित जाचक असलेली १५ वर्षे प्रसामान्य उत्पादनामध्ये ठेवण्याच्या कालावधीची अट कमी करुन लघु उद्योगांसाठी फक्त ३ वर्षे, मध्यम व मोठया उद्योगांना फक्त ५ वर्षे व मेघा उद्योगांना फक्त ७ वर्षे प्रसामान्य उत्पादनात असलेले सर्व बंद उद्योगाच्या हस्तांतरणास परवानगी देण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी उद्योगजकांची मागणी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या मागणीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०७-२०१६) :** (१), (२) व (३) सामूहित प्रोत्साहन योजनेच्या कार्यनियमावलीनुसार पात्र घटकांचा कार्यकालावधी निश्चित करण्यात आला आहे. पुर्वीच्या नियमानुसार सदरचा कालावधी हा २० वर्ष इतका होता. त्यामध्ये बदल करुन शासनाने दिनांक २१/५/२००८ च्या शासन निर्णयानुसार प्रसामान्य उत्पादनात रहाण्याचा कालावधी अनुक्रमे सुक्ष्म व लघु उद्योग घटक ५ वर्ष, मध्यम व मोठे उद्योग घटक ७ वर्ष व विशाल प्रकल्प १० वर्ष असा निश्चित केला आहे.

सामप्रोयो-२०१३ नुसार काही प्रकरणी उद्योग घटक हा दुसऱ्या घटकास पुर्व परवानगीने हस्तांतरीत करण्याची तरतूद आहे. तसेच त्यांना विहित निकषानुसार प्रोत्साहने अनुज्ञेय आहेत.

तसेच शासनाने साप्रोयो अंतर्गत पात्र घटकांच्या कार्यकालावधीमध्ये बंद घटकांच्या प्रोत्साहनांच्या वसुलीबाबत वेळोवेळी सुधारणा केल्या आहेत.

---

**भोकर (जि.नांदेड) येथील ग्रामीण रुग्णालयातील वैदयकीय अधिक्षकाचे रिक्त पद भरणेबाबत**

**(१५) १५०७१ (०२-०५-२०१६). श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) येथील ग्रामीण रुग्णालयात अनेक वर्षापासून वैदयकीय अधिक्षक पद रिक्त असून रुग्णांची गैरसोय होत असल्याने सामाजिक कार्यकर्ते यांनी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयासमोर दिनांक २८ डिसेंबर, २०१५ पासून आमरण उपोषण सुरु केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे रिक्त पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे,

वैद्यकीय अधिक्षकाचे पद रिक्त आहे. तथापि, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ ग्रेड पे ५४०० मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची ग्रामीण रुग्णालयातील ३ पदे व ट्रामा केअर सेंटर येथील ५ पदे अशी एकूण ८ पदे मंजूर असून ती सर्व पदे भरलेली आहेत. रुग्णालयातील वरीष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्याकडे वैद्यकीय अधीक्षक पदाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. वैद्यकीय अधीक्षकाचे रिक्त पद भरण्याबाबत प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर केल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक यांनी सामाजिक कार्यकर्त्यांना सांगितल्याने उपोषण मागे घेण्यात आले.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ ग्रेड पे ६६०० मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कामठी (जि.नागपूर) येथील उपजिल्हा रुग्णालयात पूर्णकालीन वैद्यकीय अधिक्षक कार्यरत नसल्याबाबत**

**(१६) १५१७४ (०२-०५-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामठी (जि.नागपूर) येथील उपजिल्हा रुग्णालयात पूर्णकालीन वैद्यकीय अधिक्षक कार्यरत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे रुग्णांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच येथील रुग्णसंख्या लक्षात घेता तेथे डॉक्टर, कर्मचारी तसेच खोल्यांची कमतरता आहे, हे ही खरे आहे का,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

**डॉ. दीपक सावंत (१६-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय कामठी येथील वैद्यकीय अधीक्षकाचे पद दिनांक १०/९/२०१५ पासून बदलीमुळे रिक्त आहे.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरलेली असून, त्यांचेमार्फत रुग्णांवर योग्य ते उपचार करण्यात येत आहेत.

(३) हे खरे नाही.

५० खाटांच्या रुग्णालयाचे बांधकाम शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार खोल्या उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कामगारांचे हिताकरिता स्थापित कामगार कल्याण मंडळातील रिक्त पदांबाबत**

**(१७) १५२०३ (२९-०४-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामगारांचे हिताकरिता स्थापित कामगार कल्याण मंडळाच्या किती विभागात आयुक्त आहेत,

(२) असल्यास, कामगार आयुक्तांची किती पदे किती वर्षापासून रिक्त आहेत, रिक्त पदे किती दिवसात भरण्यात येतील, निधी पूरेसा येत नसल्यामुळे या कामगार केंद्रावर आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर विभागात किती केंद्र कार्यरत आहेत ?

**श्री. संभाजी पाटील निलगेकर (१९-०७-२०१६) :** (१) मंडळातील एकूण ७ विभागात सहायक कल्याण आयुक्त हि पदे असून (नागपूर/नाशिक/ठाणे/मुंबई/पुणे/अकोला/औरंगाबाद) त्यापैकी नागपूर, नाशिक, ठाणे, मुंबई या विभागात पुर्णवेळ सहायक कल्याण आयुक्त कार्यरत आहेत. नागपूर व ठाणे येथील सहायक कल्याण आयुक्तांना अनुक्रमे अकोला व पुणे येथील अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे व औरंगाबाद येथे कामगार कल्याण अधिकारी यांना प्रभारी कार्यभार दिलेला आहे.

(२) सहायक कल्याण आयुक्ताची ३ पदे गेल्या ५ वर्षापासून रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. विभागीय कार्यालयाकडून मागणी केल्यानुसार आवश्यक निधी त्यांचे मागणीनुसार उपलब्ध करून देण्यात येतो. त्यामुळे कामगार कल्याण केंद्रावर सोई सुविधा उपलब्ध नाहीत असे मंडळाच्या निदर्शनास आले नाही.

(३)

| | |
|---|---|
| १.प्रकल्प | : ०१ |
| २.कामगार कल्याण भवन | : ०१ |
| ३.ललित कला भवन | : ०४ |
| ४.कामगार कल्याण केंद्र | : ३२ |
| ५.कामगार कल्याण ग्रामीण केंद्र | : ०१ |
| एकुण | : ३९ |

---

**नागपूर येथील वसंतराव देशपांडे सभागृहाच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१८) १५२९० (२८-०४-२०१६). श्री.नागो गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत असणारे नागपूर येथील वसंतराव देशपांडे सभागृहाचे तळघर दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्राला भाडेतत्वावर देण्यात आले आहे, दरमहा भाडे किती तसेच थकीत रक्कम रुपये ७७,०००/- ही वसूल करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(२) असल्यास, या सांस्कृतिक केंद्राच्या अनियमित व गैरकारभाराची चौकशी सीबीआई करीत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशी अहवालाचे निष्कर्ष काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०७-२०१६) :** (१) होय.

सदर सभागृह दिनांक २ डिसेंबर, १९९१ पासून रू. ५,७००/- दरमहा भाडेतत्वावर देण्यात आले आहे. सभागृहाच्या थकीत भाडयाची रक्कम रू. ७७,२०,२७२/- एवढी असून थकीत भाडे वसूलीबाबत संचालक, दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच उपसचिव, सांस्कृतिक मंत्रालय, नवी दिल्ली (भारत सरकार) यांनाही थकीत भाडे रक्कमेबाबत अवगत करण्यात आले आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंध फक्त सभागृहाच्या भाडे वसुलीबाबत असल्याने याबाबतची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ६ हजार कि.मी.लांबीच्या रस्त्यांना राष्ट्रीय महामार्गांचा दर्जा देण्याबाबत**

**(१९) १५३७० (२८-०४-२०१६). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने ६ हजार कि.मी.लांबीच्या रस्त्यांना राष्ट्रीय महामार्गांचा दर्जा देण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविलेला होता, त्यापैकी केंद्र शासनाने २४०५ कि.मी.लांबीच्या ११ रस्त्याचे राष्ट्रीय महामार्गात रुपांतर करण्यास माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित रस्त्यांना मान्यता मिळविण्याबाबत शासनाने काय पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.
केंद्र शासनाने आजपर्यंत महाराष्ट्र राज्यातील एकूण १०८५१ कि.मी. लांबीच्या ९९ रस्त्यांचे राष्ट्रीय महामार्गात रूपांतर करण्यास तत्वत: मान्यता दिली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील पाझर तलावातील गाळ व माती काढून टाकण्यासाठी करावयाची कार्यवाही**

**(२०) १५४६६ (०२-०५-२०१६). श्री.आनंदराव पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यात सन १९७२ मध्ये बांधलेल्या पाझर तलावांची संख्या ४०० असून या पाझर तलावातील गाळ व माती काढून खोलीकरण करणे गरजेचे असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाझर तलावातील गाळ व माती काढून खोलीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०७-२०१६) :** (१) होय.
(२) शासनाच्या जलयुक्त शिवार अभियानातून डिझेलचा खर्च देवून लोकसहभागातून गाळ काढण्यात येत आहे. आतापर्यंत सातारा जिल्ह्यातील १०८ तलावामधून अंदाजे १२००० ब्रास गाळ काढण्यात आलेला आहे. तसेच यांत्रिकी विभाग, महाराष्ट्र शासन व ग्रामस्थांचे मार्फत स्वखर्चातून गाळ उचलणेची मोहिम राबविण्यात येत आहे.
(३) सदर पाझर तलावातील गाळ काढण्याची कार्यवाही टप्प्याटप्प्याने प्रगतीत असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### आर्णी अंबोडा (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील मजुरांना सेवेत नियमित करण्याबाबत

**(२१) १५६७० (०२-०५-२०१६). श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.रामराव वडकुते, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ वनपरिक्षेत्र अंतर्गत सन १९८९ ते १९९३ या कालावधीतील रोजगार हमी योजनेअंतर्गत काम करणाऱ्या कामगारांना सेवेत नियमित केले, तथापि शेंबाळपिंप्री वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी अंबोडा या गावातील मजुरांना डालवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सन १९८९ ते १९९३ कालावधीत अंबोडा गावांतील रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या कामगारांना नियमित आस्थापनेवर कामावर घेणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०७-२०१६) :** (१) शासन निर्णय दिनांक ३१/१/१९९६ नुसार वन विभागामध्ये योजना/योजनेत्तर योजनेमध्ये दिनांक १/११/१९९४ रोजी ५ वर्षाची सलग सेवा पूर्ण केलेली आहे, अशा मजूरांना कायम करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयामध्ये रोजगार हमी योजना किंवा रोजगार हमी देणाऱ्या तत्सम योजनेवर केलेल्या कामाचे दिवस विचारात घेवू नये, असा निर्णय आहे. त्यामुळे रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या कामगारांना सेवेत नियमित केले, हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत

**(२२) १६०६४ (२७-०४-२०१६). श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण :** तारांकित प्रश्न क्रमांक ७५२५ ला दिनांक २७ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान देण्यासाठी त्यांची तपासणी करुन प्रस्ताव शासनस्तरावर संचालकांनी पाठविलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०७-२०१६) :** (१) होय.

(२) आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचेकडून प्राप्त केंद्रीय अनुसूचित जाती आश्रमशाळांच्या तपासणी अहवालाची शासन स्तरावर छाननी करण्यात आली आहे. त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सन २०१५ मध्ये नागपूर येथे हिवाळी अधिवेशनाच्या खर्चाबाबत**

**(२३) १६१४३ (०२-०५-२०१६). श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनातर्फे नागपूर येथे हिवाळी अधिवेशन दिनांक ७ ते २३ डिसेंबर, २०१५ या कालावधीत घेण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिवेशन दरम्यान शासनाला किती खर्च आला आहे,

(३) असल्यास, त्यापैकी विभागवार खर्च किती आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षातील नागपूर येथील हिवाळी अधिवेशनासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांना "मागणी क्रमांक ए-४, नागपूर येथील राज्य विधान-मंडळाच्या हिवाळी अधिवेशनासंबंधीचा खर्च (२०५२००५२) या अंतर्गत ५० - इतर खर्च" या लेखाशीर्षाखाली एकूण रुपये २,०४,००,०००/- इतका निधी वितरीत करण्यात आला होता. त्यापैकी रुपये १,८४,२३,६७२/- इतका खर्च झाला आहे.

यामधून हिवाळी अधिवेशनाच्या कामासाठी नागपूर येथे जाणारे शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची कार्यालयीन व्यवस्था, निवास व्यवस्था, स्थानिक वाहन व्यवस्था, संगणक, स्टेशनरी व इतर अनुषंगिक खर्च भागविण्यात येतो. त्यामुळे याकरीता विभागावर खर्चाचा प्रश्न उद्भवत नाही.

या व्यतिरिक्त अधिवेशनाच्या कामासाठी नागपूर येथे जाणारे अधिकारी/कर्मचारी यांचा प्रवासखर्च व दैनिक भत्ता याबाबतचा प्रवास खर्चासाठी दिलेल्या एकूण तरतूदीमधून करण्यात येतो.

---

**विविध शासकीय कार्यालयातील लाचखोरीला आळा घालणेबाबत**

**(२४) १६८८१ (२८-०४-२०१६). श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** तारांकित प्रश्न क्रमांक १२५२४ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध शासकीय कार्यालयात १५८४ शासकीय कर्मचाऱ्यांनी रुपये २ कोटी ४६ लाख २३ हजार ९७१ इतक्या रक्कमेची लाच मागितल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईतून स्पष्ट झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे येथे सन २०१४ मध्ये २१३ व सन २०१५ मध्ये २१५ शासकीय कर्मचाऱ्यांनी लाचखोरी केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आकडेवारीवरुन राज्यात लाचखोरी वाढली असून प्रत्यक्षात कारवाईचे प्रमाण कमी झाल्याची बाब निदर्शनास आली असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून विविध शासकीय कार्यालयातील लाचखोरीला आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :** (१) दिनांक ०१.०१.२०१५ ते ३१.१२.२०१५ या कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा प्रकरणी केलेल्या कार्यवाहीत एकूण १५९३ व्यक्तींना रुपये ३,३३,३६९२१/- इतक्या रक्कमेची लाचेची मागणी केल्याने पकडण्यात आले.

(२) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्रामध्ये सन २०१४ मध्ये एकूण २१३ सापळा प्रकरणी, २३८ लोकसेवक व ५१ खाजगी इसम अशा २८९ व्यक्तींवर कारवाई करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे सन २०१५ मध्ये एकूण २१७ सापळा प्रकरणी, २३० लोकसेवक व ४९ खाजगी इसम अशा २७९ व्यक्तींवर कारवाई करण्यात आली आहे.

(३) व (४) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्वारे राज्यात सन २०१४ मध्ये सापळा, अपसंपदा व अन्य भ्रष्टाचार या संदर्भात एकूण १३१६ गुन्हे दाखल असून त्यातील आरोपी १९१७ आहेत. त्याचप्रमाणे राज्यात सन २०१५ मध्ये सापळा, अपसंपदा व अन्य भ्रष्टाचार या संदर्भात एकूण १२७९ गुन्हे दाखल असून त्यातील आरोपी १९१७ आहेत. राज्यातील लाचखोरीला आळा घालण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्वारे उपाययोजना करण्यात येतात.

(i) शासकीय लोकसेवकाद्वारे लाचेची मागणी, अपसंपदा व इतर भ्रष्टाचाराबाबतची तक्रार www.acbmaharashtra.net या मोबाईल ॲपवर, टोल फ्री क्र.१०६४ या हेल्पलाईनवर तसेच whatsapp No.९९३०९९७७०० व www.facebook.com या फेसबुक अकाऊन्टवर तक्रार करता येते.

(ii) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ई-मेल आयडी acbwebmail@mahapolice.gov.in यावर तसेच ब्युरोतील कार्यरत परिक्षेत्रीय अधिकाऱ्याच्या ई-मेल आयडीवर देखील तक्रार करता येते.

iii) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या acbwebmail@mahapolice.gov.in या वेबसाईवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्वारे केलेल्या कार्यवाहीची माहिती वेळोवेळी प्रसिध्द केली जाते.

iv) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यपध्दती बाबत एफ.एम.रेडीओ, दुरदर्शनवर परिसंवाद आयोजित करुन जनजागृती केली जाते. तसेच ब्युरोमधील अधिकारी/कर्मचारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय कार्यालयाना भेटी देवून एसीबीच्या कार्यपध्दतीबाबत नागरीकांना माहिती देतात. तसेच आठवडी बाजार, एस.टी.स्टॅड, कॉलेज या ठिकाणी जावून तसेच गावोगावी पोस्टर व स्टिकर लावून जनजागृती केली जाते.

---

**राज्यातील जलसंधारण महामंडळास १० वर्षाची मुदतवाढ व निधी मिळण्याबाबत**

**(२५) १७२८८ (०२-०५-२०१६). श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जलसंधारण महामंडळाची ५ वर्षांची वाढीव मुदत सन २०१५ मध्ये संपल्याने महामंडळाला पुन्हा १० वर्षासाठी मुदतवाढ मिळावी व त्यासाठी १० हजार कोटी रुपयांचा निधी महामंडळाला उपलब्ध करुन द्यावा असा प्रस्ताव माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०७-२०१६) :** (१) होय.

(२) मार्च, २०१६ च्या विधानमंडळाच्या अधिवेशनात दोन्ही सभागृहात महामंडळाला सन २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येवून रुपये १०,००० कोटी इतक्या रकमेच्या दुरुस्तीस मान्यता दर्शविण्यात येवून दिनांक १६/४/२०१६ अन्वये अध्यादेश निर्गमित करण्यात आला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आरोग्य विमाधारकांच्या तक्रारीत वाढ होत असल्याबाबत**

**(२६) १७३५८ (०४-०५-२०१६). श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य विमाधारकांच्या तक्रारीत वाढ होत असून गेल्या आर्थिक वर्षात सुमारे २५ हजार ६०० तक्रारी नोंदविल्या गेल्या आहेत, त्यातील ३३ टक्के तक्रारी पॉलीसी संदर्भातील असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विमाधारकांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०७-२०१६) :** (१) नाही.

०१.०४.२०१५ ते दि. ३१.०३.२०१६ या योजनेच्या आर्थिक वर्षाच्या कालावधीत २,८८२ लाभार्थ्यांनी तक्रारी नोंदविल्या आहेत.

(२) उपरोक्त तक्रारांपैकी २२११ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असुन विविध स्वरुपांच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर दोन रुग्णालयांचे निलंबन करण्यात आले आहे व १२० रुग्णालयांची मान्यता रद्द करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील कै.दिपक कोलते या पोलीस नायक शिपाई यांच्या कुटुंबियास आर्थिक मदत देण्याबाबत**

**(२७) १७३६८ (०१-०६-२०१६). श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अरुणकाका जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ११११५९ ला दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील कै.दिपक कोलते या पोलीस नायक शिपायाची कर्तव्यावर असताना पिन्या कापसे व टोळीकडून दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास हत्या करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कै.दिपक कोलते यास शहीद पोलीसाचा दर्जा देऊन त्यास त्याप्रमाणे मदत करण्याचे आश्वासन मा.मुख्यमंत्री यांनी माहे मार्च, २०१५ च्या अधिवेशनात दिले होते, परंतु ९ महिन्यानंतरही कै.कोलते यांचे कुटुंबियास कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात आली नाही तसेच त्यास शहीद पोलीसाचा दर्जा देण्याबाबतची कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान याबाबत मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) कै.दिपक कोलते यांना शासन निर्णय दिनांक २ जुलै, २०१५ अन्वये रु. ७.५० लाख इतकी नुकसान भरपाई मंजुर करण्यात आलेली आहे.

त्यानंतर दिनांक ६ फेब्रुवारी, २००९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कै.कोलते यांना शासन निर्णय दिनांक १५ जून, २०१६ अन्वये विशेष बाब म्हणून इतर सोयीसुविधा देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

---

**राज्यात आमदार आदर्श ग्राम योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत**

**(२८) १७४५६ (०२-०५-२०१६). श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमदार आदर्श ग्राम योजनेत अनेक मंत्री आणि आमदार अशा एकुण २११ लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ डिसेंबर, २०१५ अखेर आदर्श गावांची निवड केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने परिपत्रकातील वेळापत्रकानुसार विहित मुदतीत योजनेतील प्रभारी अधिका-यांची नेमणुक केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रभारी अधिका-यांची नेमणुक करण्याची मागणी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे आहे,

(४) दिनांक ८/१०/२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकातील वेळापत्रकानुसार राज्यातील किती जिल्ह्यात प्रत्यक्ष कार्यवाही सुरु आहे किती आमदारांनी विहित मुदतीत गावांची निवड केली शासनाने विहित मुदतीत किती जिल्ह्यात प्रभारी अधिका-यांची नियुक्ती केली,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

आजमितीस एकूण १९९ प्रभारी अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सद्य:स्थितीत राज्यातील एकूण ३५ जिल्ह्यात कार्यवाही चालू आहे. २७६ विधानपरिषद व विधानसभा सदस्यांनी ग्राम पंचायतींची निवड केली आहे. त्यापैकी १९९ प्रभारी अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे.

(५) उर्वरित ग्रामपंचायतींची निवड न केलेल्या विधानसभा/विधानपरिषद सदस्यांकडे शासन स्तरावर तसेच जिल्हाधिकारी यांचेमार्फत ग्रामपंचायतींची निवड करण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. तसेच उर्वरित प्रभारी अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**कंजारभाट समाजातील एका महिलेचा जात पंच छळ करीत असल्याबाबत**

**(२९) १७५३० (२८-०४-२०१६). श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस अधीक्षक, नाशिक यांचेकडे कंजारभाट समाजातील एका महिलेने जात पंचायतीच्या अघोरी शिक्षेविरोधात माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिलेच्या तक्रारीनंतर व त्याआधी नंदूरबार पोलिसांनी संबंधित पंचांकडून अमानुष प्रकार करणार नाही असे लिहून घेऊनही संबंधित जमातीचे पंच महिलेचा वारंवार छळ करीत असल्याबाबत त्या महिलेने पोलीस अधीक्षकांना दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर महिलेचा मानसिक छळ करणाऱ्या मावस दिर तसेच पंचांविरुध्द कारवाई करून सदर महिलेस भविष्यात असा त्रास होऊ नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६) :** (१) होय.

(२) गैरअर्जदारांकडून पोलीसांनी प्रतिज्ञापत्र लिहून घेतले नसून गैरअर्जदार यांना दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ रोजी चौकशी कामी पोलीस ठाण्यात बोलविले असता ते प्रतिज्ञापत्रासह पोलीस ठाणेला हजर झाले. त्यांचेवर केलेले आरोप खोटे असल्याचे सांगून त्यांनी स्वत: तसे प्रतिज्ञापत्र लिहून हजर केले आहे. त्यात अशा कोणत्याही विधी, रूढी रिवाज परंपरा समाजात अस्तित्वात नसल्याचे नमूद केले आहे.

अर्जदार महिलेच्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने झालेल्या चौकशीत जातपंचायतीकडून कोणताही छळ झालेला नसून तो विधी होईल अशी भिती अर्जदार यांना होती त्यामुळे सदरचा तक्रार अर्ज केला होता.

(३) अर्जदार हिने माहेरी ओझर जि. नाशिक येथे जाऊन दिनांक ५ फेब्रुवारी, २०१६ रोजी फिर्याद दिली आहे. सदर फिर्याद दिनांक ६ फेब्रुवारी, २०१६ रोजी नंदूरबार शहर पोलीस ठाण्यात प्राप्त झाली त्यावर नंदूरबार शहर पोलीस ठाण्यात वर्ग ५ गुरनं २०/२०१६ भादवि क ३५४ अ ब, ३८४, १२० ब, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हा दाखल झालेनंतर यातील आरोपीतांना मा.सत्र न्यायालय नंदुरबार यांचे कोर्टाकडून अंतरीम जामीन मंजूर झाला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रियल इंडिया होम्स यांनी ग्राहकांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत**

**(३०) १७५४७ (०१-०६-२०१६). श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खांदेश्वर पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे रियल इंडिया होम्सच्या श्री.संतोष अगरवाल यांचे विरोधात ४०० ते ५०० ग्राहकांनी घर देतो असे सांगून आर्थिक फसवणूक केल्याबाबतची लेखी तक्रार दिनांक ३१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.संतोष अगरवाल यास १० जानेवारीला अटक केल्यानंतर पोलिसांनी न्यायालयात पुढील तपासाकरीता १० ते १५ दिवसांचा रिमांड न मागण्याची कारणे काय आहेत तसेच त्याला किती दिवसांचा जामीन मिळालेला आहे व तो जामीनावर असतानाच फरार होऊ नये म्हणून पोलिसांनी मा.न्यायालयाला विनंती करुन त्याच्या हजेरीबाबत अटी घालून ठेवल्या आहेत काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) संतोष अग्रवाल ऊर्फ सोनु, वय ३१ वर्षे यास दि.१०.१.२०१६ ते दि. २२.१.२०१६ रोजी पर्यंत एकुण १२ दिवस पोलीस कोठडी मा. न्यायालयातून मंजूर झालेली आहे. त्यानंतर त्यास मा.न्यायालयातून जामीन मंजूर होवून जामिनावर सुटलेला आहे.

मा.न्यायालयाने आरोपीस रु. १५,०००/- चा वैयक्तिक जातमुचलका आणि जामिनबंध पत्रावर तपास अधिकारी यांना सहकार्य करण्याचे अटीवर आणि तपासाच्या कामात अडथळा न आणण्याच्या अटीवर सोडुन देण्यात आले आहे.

(३) सदर गुन्हयाचा सखोल तपास चालु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद येथे मंत्री मंडळाची बैठक आयोजित करणेबाबत**

**(३१) १७५९५ (०४-०५-२०१६). श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील सिंचनासह इतर अनुशेष दुर करण्यासाठी मंत्रीमंडळाची बैठक सन २०१३ पर्यंत दरवर्षी औरंगाबाद येथे आयोजित करण्यात येत होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील भिषण दुष्काळ आणि तीव्र टंचाईची परिस्थिती असतानाही युती शासनाच्या काळात ही बैठक आयोजित करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाडयातील सततची दुष्काळ परिस्थिती, सिंचनाचा अनुशेष आणि वाढत्या शेतकरी आत्महत्या याबाबत चर्चा आणि उपाययोजना करणेसंदर्भात शासन औरंगाबाद येथे मंत्रीमंडळाची बैठक घेणार आहे काय,

(४) मराठवाडयातील प्रश्नांसंदर्भात चर्चा करुन त्यावर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने विधीमंडळाचे एक अधिवेशन औरंगाबाद येथे आयोजित करण्याच्या विचाराधीन बाबीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) औरंगाबाद येथे मंत्रीमंडळ बैठक आयोजित न करण्याची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) सन २००५ ते सन २००८ या कालावधीत मंत्रिमंडळाची एक बैठक औरंगाबाद येथे आयोजित करण्यात येत होती. तद्‌नंतर बैठक आयोजित करण्यात आलेली नाही.

(३) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) विधी मंडळाचे अधिवेशन मुंबई व नागपूर येथे घेण्यात येते व त्यामध्ये मराठवाडयाच्या प्रश्नाबाबत ही चर्चा होते.

(५) वरील (३) प्रमाणे मंत्रिमंडळ बैठक औरंगाबाद येथे आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**राज्यातील मोठ्या प्रकल्पावरील बंद उपकरणे सुरु करण्याबाबत**

**(३२) १८०१५ (०२-०५-२०१६). श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मोठ्या प्रकल्पावरील उपकरणे बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार बंद असलेली उपकरणे सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०७-२०१६) :** (१) सन २०१५ पावसाळा पुर्व व पावसाळा उत्तर धारण तपासणी अहवालांनुसार ७३ मोठया धरणावर उपकरणे बसविलेली असून त्यापैकी ३५ धरणावरील उपकरणे बंद व ३८ धरणावरील उपकरणे चालू स्थितीत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) व (३) धरणावरील बंद/नादुरूस्त उपकरणाबाबत करावयाच्या उपाययोजनाबाबत शासन निर्णय क्र. धसुस २०१४ (६२१/२०१४) सिंव्य (कामे) दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ अन्वये शासन धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**ठाणे जिल्हयातील भिवंडी वाडा, वंजारपट्टी नाका राजीव गांधी चौक ते साईबाबा मंदिर आणि माणकोली येथील उड्डाणपूल बांधकामास मंजुरी देण्याबाबत**

**(३३) १८२०५ (२७-०४-२०१६). ॲड.अनिल परब :**सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कल्याण भिवंडी मार्गावरील दुर्गाडी जवळ सहापदरी पूल, भिवंडी वाडा, नाशिक रस्त्याकडे जाण्यासाठी वंजारपट्टी नाका, भिवंडी ते कल्याण रस्त्यावरील राजीव गांधी चौक ते साईबाबा मंदिर आणि ठाणे-डोंबिवली रस्त्यावर माणकोली येथे उड्डाणपूल बांधण्याच्या कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाणपूलांच्या बांधकामास प्रत्येकी किती खर्च येणार आहे व निधीची तरतूद कशा प्रकारे करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर उड्डाणपूलांची कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :** (१) होय.

(२) सदर उड्डाणपुलांच्या बांधकामास खालीलप्रमाणे खर्च येणार आहे. कल्याण भिवंडी मार्गावरील दुर्गाडी जवळ सहापदरी पूल रुपये ७५.६२ कोटी, भिवंडी वाडा, नाशिक रस्त्याकडे जाण्यासाठी वंजारपट्टी नाका रुपये ६३.७१ कोटी, भिवंडी ते कल्याण रस्त्यावरील राजीव गांधी चौक ते साईबाबा मंदीर रुपये १५०.२४ कोटी, ठाणे-डोंबिवली रस्त्यावर माणकोली येथे उड्डाणपूल रुपये २२३.२५ कोटी, उपरोक्त उड्डाणपुलांच्या बांधकामास आवश्यक निधीची तरतूद विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत करण्यात आली आहे.

(३) सदर उड्डाणपुलांची कामे खालील कालावधीमध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

| कामाचे नाव | कार्यारंभ आदेश दिनांक | कंत्राटाचा कालावधी महिन्यामध्ये (पावसाळ्यासहीत) |
|---|---|---|
| कल्याण भिवंडी मार्गावरील दुर्गाडी जवळ सहापदरी पूल | ११/०३/२०१६ | २४ महिने |
| भिवंडी वाडा, नाशिक रस्त्याकडे जाण्यासाठी वंजारपट्टी नाका येथील उड्डाणपूलाचे काम | ०९/०३/२०१२ | पूर्ण |
| भिवंडी ते कल्याण रस्त्यावरील राजीव गांधी चौक ते साईबाबा मंदीर येथील उड्डाणपुल पुर्ण करण्याचा कालावधी | ०८/०१/२०१६ | ३० महिने |
| ठाणे-डोंबिवली रस्त्यावर माणकोली येथे उड्डाणपूल | १४/०३/२०१६ | ३६ महिने |

---

**नाशिक येथे पोलीस कारवाईची भिती दाखवून खंडणी मागणाऱ्या पोलीस हवालदारासह तिघांना अटक केल्याबाबत**

**(३४) १८३२७ (२९-०४-२०१६). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे गंगापूर रोड भागातील एका नागरिकास पोलीस कारवाईची भिती दाखवून खंडणी मागणाऱ्या पोलीस हवालदारासह तिघांना मुंबई नाका येथे सापळा रचून अटक करण्यात आल्याचा प्रकार दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलिसांनी तपास केला आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) पोलीस विभागात लाचखोरीची प्रकरणे मोठ्या संख्येने निदर्शनास येत असल्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने कोणती विशेष उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) दिनांक ०१.०१.२०१६ ते २३.०६.२०१६ या कालावधीत सापळा प्रकरणी पोलीस विभागात राज्यात एकूण ११७ गुन्ह्यामध्ये १४६ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येत आहे.

---

**राज्यातील सामाजिक न्याय विभागातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन थकीत असल्याबाबत**

**(३५) १८३३२ (२७-०४-२०१६). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागातील विजाभज उच्च माध्यमिक आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदनिर्मिती व वेतनाच्या उच्चस्तरीय समितीने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या माहितीसह असलेला प्रस्ताव मंत्री मंडळासमोर सादर करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला सदर निर्णयाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (११-०७-२०१६) :** (१) नाही.

(२) व (३) उच्चाधिकार समितीने उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या माहितीसह व मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर फेर सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**नागपूर येथील विधीमंडळ अधिवेशन कालावधीत करण्यात येणाऱ्या निवास व्यवस्था व सौंदर्यीकरणाबाबत**

**(३६) १८६४८ (२८-०४-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील विधीमंडळ अधिवेशन कालावधीत निवास व्यवस्था व सौंदर्यीकरण याकरिता दरवर्षी किती रक्कम खर्च करण्यात येते, सदर व्यवस्था कोणाच्या माध्यमातून करण्यात येते,

(२) असल्यास, अधिवेशन सुरु होण्याच्या एक दिवस आधीपर्यंत सदर काम करण्यात येते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वेळेअभावी उपरोक्त काम तात्पुरत्या स्वरुपाचे होत असल्यामुळे याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०७-२०१६) :** (१) नागपूर येथील विधीमंडळ अधिवेशन कालावधीत निवासव्यवस्था व सौंदर्यीकरण करण्याकरिता साधारणत: रु. १२.०० कोटी खर्च होतो. खुल्या ई निविदा प्रक्रियेमार्फत कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येते.

(२) हे खरे नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील आयटी पार्कमधील इन्फोसिस कंपनीच्या आवारात महिला कर्मचाऱ्यावर सफाई कामगारांनी बलात्कार केल्याची घटना**

**(३७) १८६८२ (२९-०४-२०१६). श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील आयटी पार्क मधील इन्फोसिस कंपनीत सुरक्षितता असतानाही कंपनीच्या आवारात कॅन्टीनमधील महिला कर्मचाऱ्यावर तेथील सफाई कामगारांनी बलात्कार केल्याची घटना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलांच्या सुरक्षिततेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१६) :** (१) होय.

सदर प्रकरणी फिर्यादी महिलेने दिलेल्या तक्रारीवरुन हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३९६/२०१५ भादवि कलम ३७६,५०६, ३४ माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६७ (ए) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आले आहे. आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, खटला न्यायप्रविष्ट आहे.

(२) महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना :-

-- गर्दीचे ठिकाणी साध्या वेशातील महिला पोलिसांची व इतर पोलिसांची कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली.

-- गर्दीचे व महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा लावण्याच्या सूचना देण्यात आले आहे.

--- शैक्षणिक संस्था व आय.टी.कंपन्यामध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात येते.

--- १०९१ हा महिला हल्पलाईनचे पोस्टर वाहनांमध्ये लावण्यात आले,

-- पोलीस स्टेशनमध्ये स्वागत कक्षात महिला पोलीस कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात आले.

-- प्रत्येक पोलीस स्टेशनला महिला पोलीस बीट मार्शल नेमण्यात आले आहे.

-- शाळा, कॉलेज येथे अचानक भेट देवून रोड रोमियोवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते.

-- महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस मुख्यालयात कराटे प्रशिक्षण व स्व संरक्षणाचे प्रशिक्षण दिले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात अतिरिक्त जिल्हाधिकारी (अपील) पद निर्माण करण्याबाबत

**(३८) १८९०५ (२७-०४-२०१६). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात मोठ्या प्रमाणावर अपील करणे प्रलंबित राहत असल्याकारणाने अतिरिक्त जिल्हाधिकारी (अपील) असे पद निर्माण करुन पात्र उमेदवारांना या पदावर पदोन्नती देण्याबाबत सन २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात संबंधित मंत्री महोद्यांनी आश्वासन दिले होते, मात्र एक वर्षे होऊनही याबाबत कोणताही निर्णय घेण्यात न आल्याचे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१३-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

यासंदर्भात नमूद करण्यात येते की, निवडश्रेणी अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत अ.मु.स. (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली आस्थापना मंडळ क्र.२ (सा.प्र.वि.) यांची दिनांक २६ नोव्हेंबर, २०१५ रोजी बैठक झाली. त्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या कार्यवृत्तानुसार पदोन्नती/पदस्थापना देण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला. शासन मान्यतेनंतर दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी संबंधित अधिकाऱ्यांना पदोन्नती/पदस्थापना देण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई, धारावी येथे विद्यार्थी संघटनेतील तरुणांना मारहाण झाल्याबाबत

**(३९) १८९०८ (२८-०४-२०१६). श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हैद्राबाद विद्यापीठात निलंबनाला कंटाळून रोहीत वेमुला या पीएचडीच्या विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याप्रकरणी मुंबईतील काही विद्यार्थी संघटनांनी धारावी येथे प्रचार सुरु केला असता त्यांच्यावर आठ ते दहा तरुणांनी हल्ला करुन बेदम मारहाण केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन मारहाण करणाऱ्यांवर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१६) :** (१) व (२) हैदराबाद विद्यापीठात निलंबनाला कंटाळून रोहीत वेमुला या पीएचडीच्या विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याप्रकरणी मुंबईतील काही विद्यार्थी संघटनांनी रोहीत वेमुला यांच्या मृत्यूच्या निषेधार्थ दिनांक २४/०१/२०१६ रोजी धारावी येथे रॅली काढली होती. या ठिकाणी १५ ते २० अनोळखी इसमांनी सदर रॅलीमधील फिर्यादी व इतरांना गैरकायदेशीर मंडळी जमवून जातीवाचक शिवीगाळ करुन मारहाण केली. तसेच रॅलीमधील महिलांचे अंगावरील कपडे खेचून विनयभंग केला म्हणून धारावी पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. भादवि कलम १४३, १४४, १४५, १४७, १४९, ३२४, ३५४ भादवि सह अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ चे कलम ३(१)(१०) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस आयुक्त, कुर्ला विभाग, मुंबई करत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिर्डी येथील विमानतळाचे काम पूर्ण करण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत

**(४०) १८९३५ (२८-०४-२०१६). श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.साई शताब्दी सुरु होण्याआधी शिर्डी येथील विमानतळाचे काम पूर्ण करण्याचा निर्णय शासनाने माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शासन निर्णय दिनांक २२/०२/२०१६ अन्वये शिर्डी विमानतळाच्या कामासाठी सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे शिर्डी विमानतळाची कामे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून सुरु आहेत. विमानतळाच्या परवान्यासाठी Director General Civli Aviation यांनी केलेल्या सूचनांप्रमाणे कामे पुर्ण करण्यात येत आहेत.

---

## वरुड (जि.अमरावती) तालुक्यात होणारी अवैध वृक्षतोड

**(४१) १९०९६ (०२-०५-२०१६). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड (जि.अमरावती) तालुक्यात अवैध वृक्षतोड होत असून त्याची वाहतूक होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध वृक्षतोड थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.

अमरावती वनविभागाचे वरूड वनपरिक्षेत्रात माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत अवैध वृक्षतोडीचे १२ व अवैध वाहतुकीचे ५ वन गुन्हे झाले आहेत.

(२) अवैध वृक्षतोड थांबविण्याबाबत पुढीलपैकी कार्यवाही केली वा करण्यात येत आहे :

- वन अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वेळोवेळी गस्त घालण्यात येते. बिट तपासणी करण्यात येते.
- अवैध वृक्षतोड आढळल्यास त्याबाबतचा वन गुन्हा ऑनलाईन नोंदविण्यासाठी वनपाल/वनरक्षक यांना PDA भ्रमणध्वनींचा पुरवठा करण्यात आला आहे.
- संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना SLR रायफलचा पुरवठा करण्यात आला आहे. मोक्याच्या ठिकाणी तपासणी नाके असून वाहतुकीतील वनोपजाची तपासणी करण्यात येते.
- फिरते पथक कार्यरत आहेत.
- बिनतारी संदेश यंत्रणा वापरात आहे.
- वृक्षतोडीवर नियंत्रण आणून वनावरील अवलंबत्व कमी करण्यासाठी स्थानिकांना स्वयंपाकाच्या गॅस पूरवठा योजना राबविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) शहरातील जमीन निजाम राजवटीत सैन्य दलासाठी वास्तव्यासाठी असल्याचा दावा केल्याबाबत

**(४२) १९१२४ (२७-०४-२०१६). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) शहरातील सर्वे नं. १८ मधील सुमारे १२३० एकर जमीन निजाम राजवटीत सैन्य दलासाठी वास्तव्यासाठी असल्याचा दावा करीत सैन्य दलाने मोजणीस सुरुवात केल्यामुळे कित्येक वर्षापासून या क्षेत्रात पक्की घरे करून राहत असलेले लाल नगर, क्रांती नगर, शेतकी महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय, दवाखाना, शासकीय कार्यालये, बी.एड. व डी. एड. महाविद्यालय, नगरपालिका व्यापारी संकुल आदि अनेक वस्त्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६) :** (१) व (२) सैन्य दलाच्या लेखी अर्जावरून जिल्हाधिकारी, बीड यांचे आदेशानुसार "फौज निगराणी तामिरात" या अंबाजोगाई शहरातील जमिनीची मोजणी उपअधीक्षक, भूमी अभिलेख, बीड यांचेमार्फत करण्यात आली आहे. त्यानंतर सदर भागातील रहिवासी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे निवेदन सादर केले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत असे दिसून आले आहे की, अंबाजोगाई, जिल्हा बीड शहरातील वेगवेगळया एकूण २१ स.नं. मधील एकूण २०५.४८ हे. आर जमिनीचे अधिकार अभिलेखात "फौज निगराणी तामिरात" अशी नोंद आहे. मात्र सदर जमीन सैन्य दलास हस्तांतरित झाल्याचे आढळून आलेले नाही. या जमिनीचे मूळ अभिलेख अंबाजोगाई तहसिल कार्यालयाच्या अभिलेख कक्षास लागलेल्या आगीत नष्ट झाल्याने ते उपलब्ध होत नाहीत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड महानगरपालिका हद्दीत तरोडा नाका ते राज कॉर्नर या रस्त्यावर ड्रेनेजचे झाकण फुटल्याने त्यामधील घाण रस्त्यावर आल्याबाबत**

**(४३) १९१४८ (२८-०४-२०१६). श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड महानगरपालिका हद्दीत तरोडा नाका ते राज कॉर्नर या रस्त्यावर ड्रेनेजचे झाकण फुटुन त्यामधील घाण रस्त्यावर आल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून महानगरपालिका प्रशासन याकडे लक्ष देत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही,
सदरील रस्त्यावर मलवाहिनी नाही. तथापि सदर रस्त्यावरील अस्तित्वात असलेल्या नालीचे पाणी राज कॉर्नरपर्यंत येवून श्रीनगर भागात उताराने वळती होते. याचा निचरा होण्यास वेळ लागतो अशा वेळेस दैनंदिन सफाई दरम्यान याची वेळोवेळी स्वच्छता करण्यात येते.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरात बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या तत्वावर करण्यात येत असलेल्या रस्त्याच्या कामाबाबत

**(४४) ३३९७८ (०४-०१-२०१३) श्री.अनिल भोसले, श्री.जयवतंराव जाधव, श्री.हेमंत टकले:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात बाधां-वापरा-हस्तांरीत करा या तत्वावर करण्यात येत असलेल्या रस्त्याचे काम धिम्या गतीने सुरु असल्याचे माहे जुलै, २०१२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुणे शहरात बांधा-वापरा-हस्तांतरीत करा तत्वावरील काम धिम्यागतीने करणाऱ्या कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१६) :** (१) पुणे महानगरपालिकेतर्फे माहे जुलै, २०१२ मध्ये पुणे शहरात बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या तत्वावर कोणतेही रस्त्यांचे काम हाती घेण्यात आले नव्हते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती-औरंगाबाद एक्सप्रेस हायवे दुरूस्ती करण्याबाबत

**(४५) ४४०२८ (१६-०८-२०१३). श्री.नागो गाणार, :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती-औरंगाबाद एक्सप्रेस हायवेवर मोठया प्रमाणात खड्डे पडल्यामुळे रस्ता दुरूस्ती करण्याबाबत लोकप्रतिनिधी, अमरावती विभाग यांनी दिनांक १० मे, २०१३ रोजी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नागपूर यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू रस्त्याच्या दुरूस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०७-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) सदर रस्त्याच्या नियतकाली दुरुस्तीसाठी महामंडळाने रू.३८.९० कोटींचा कार्यक्रम मंजूर केला होता व त्यानुसार महामंडळाकडून सदर रस्त्याची दुरूस्ती करण्यात आली आहे. सदरहू रस्ता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दिनांक २३ फेब्रुवारी, २०१५ च्या शासनाच्या निर्णयानुसार हस्तांतरित करून घेण्यात आला आहे.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांना लाखो रुपयांचा वाहनभत्ता दिला जात असल्याबाबत**

**(४६) ४४४५६ (२८-०८-२०१३) श्री.रामनाथ मोते, श्री. नागो गाणार:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता, उपअभियंता, उपआयुक्त, सहा.आयुक्त इत्यादी अधिकाऱ्यांना वाहन भत्यासाठी दरमहा किती खर्च केला जातो,

(२) असल्यास, कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांना दरमहा किती वाहन भत्ता दिला जातो,

(३) असल्यास, वाहनभत्ता कोणकोणत्या प्रयोजनासाठी दिला जातो,

(४) असल्यास, विकास कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होत नसताना अधिकाऱ्यांच्या वाहन भत्त्यासाठी दरमहा लाखो रुपयांचा निधी देण्याची कारणे काय आहेत,

(५) तसेच लोकप्रतिनिधींना अत्यंत कमी वाहन भत्ता दिला जात असताना अधिकाऱ्यांना लाखो रुपये भत्ता देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१६) :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शहर अभियंता, जलअभियंता, मुख्य वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, उपआयुक्त, सहायक आयुक्त, उपअभियंता इत्यादी संवर्गातील एकूण ५१ अधिकाऱ्यांना वाहन प्रतिपूर्ती खर्चापोटी दरमहा रु.८,००,३४२/- इतकी रक्कम अदा करण्यात येते.

(२) कार्यकारी अभियंता यांना शासनाच्या वाहन धोरण सुत्रानुसार अनुज्ञेय प्रतिमहा रु. २५,०००/- च्या मर्यादेत वाहन प्रतिपूर्ती खर्च अदा केला जातो. उपअभियंता यांना दरमहा रु.९,५००/- इतका ठोक वाहन भत्ता देण्यात येतो.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.१६१, दि.२२/०३/२००२ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या मंजूरीनुसार गठीत करण्यात आलेल्या वाहन धोरण समितीच्या शिफारशीनुसार कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेमधील तांत्रिक अधिकारी यांना प्रभागामध्ये व महानगरपालिका क्षेत्रामध्ये फिरती व प्रशासकीय कामाकरीता वाहन भत्ता देण्यात येतो.

(४) शासनाच्या वाहन धोरण सुत्रानुसार व महानगरपालिकेच्या मंजूर वाहन धोरणानुसार पात्र अधिकाऱ्यांना शासकीय वाहन उपलब्ध नसल्यास स्वत:चे वाहन वापरण्याच्या अटीवर वाहन भत्ता दिला जातो. त्यामुळे निधीचा दुरुपयोग होत नाही.

(५) महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना कमाल रुपये २५,०००/- च्या मर्यादेत वाहन भत्ता दिला जातो. महानगरपालिकेच्या लोकप्रतिनिधींपैकी महापौर व उपमहापौर यांना शासकीय वाहन उपलब्ध करुन देण्यात येते. तर सभापती, स्थायी समिती यांना रु.३०,०००/- आणि प्रभाग समिती सभापती, विरोधी पक्ष नेता, महिला व बालकल्याण समिती सभापती, आणि सभागृह नेता यांना दरमहा रुपये २५,०००/- इतका वाहन भत्ता देण्यात येतो.

वरील तपशील पाहता, लोकप्रतिनिधींना अत्यंत कमी वाहन भत्ता दिला जात असल्याची बाब वस्तुस्थितीजन्य नाही.

**नाशिक शहरासाठी मेट्रो रेल्वे किंवा रॅपिड रेल सुरू करण्यासाठी राज्य शासनाने रेल्वे कॉर्पोरेशनला शिफारस करण्याबाबत**

**(४७) ४५२८२ (२७-०१-२०१४). श्री. जयवंतराव जाधव, श्री. अनिल भोसले, श्री. हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशभरात वेगाने विस्तारणाऱ्या शहरांमध्ये चौथा क्रमांक असलेल्या नाशिक शहरासाठी मेट्रो रेल्वे किंवा रॅपिड रेल सुरू करण्यासाठी राज्य शासनाने रेल्वे कॉर्पोरेशनला शिफारस करण्याची लोकप्रतिनिधीनी दिनांक १ ऑगस्ट, २०१३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :** (१) नाशिक शहरासाठी मेट्रो रेल्वेची लोकप्रतिनिधीकडून मागणी आहे, हे खरे आहे.

(२) नाशिक मेट्रोकरिता शहर वाहतूक विषयक सर्वकष अभ्यास करून प्रस्ताव सादर करण्याबाबतचे निदेश शासनाने दिनांक ०६ डिसेंबर, २०१४ रोजीच्या पत्रान्वये नाशिक महानगरपालिकेस दिले आहेत. त्या अनुषंगाने नाशिक महानगरपालिकेने नाशिक शहरातील नागरी वाहतूक विषयक सर्वकष अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी तज्ञ सल्लागाराची नियुक्ती केली आहे. सदर अहवाल मे, २०१७ पर्यंत सल्लागारामार्फत नाशिक महानगरपालिकेस सादर करण्याचे अपेक्षित आहे. नाशिक महानगरपालिकेमार्फत शासनास अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यात मेट्रो मार्गाच्या पन्नास किलोमीटर क्षेत्रासाठी बनविण्यात आलेल्या नियमावलीबाबत**

**(४८) ४५६९४ (२०-०१-२०१४). ॲड.जयदेव गायकवाड, :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यात मेट्रो मार्गाच्या क्षेत्रात दोन्ही बाजूला पाचशे मीटरपर्यंत बांधकाम करताना यापुढे चार टक्के एफआयएस वापरा किंवा लाखो रूपयांचा सेस भरा अशाप्रकारची नियमावलीत अट घालण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियमावलीचा भुर्दंड नागरिकांना पडू नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) **व** (२) पुणे शहराच्या प्रारूप सुधारित विकास नियंत्रण नियमावलीमध्ये मेट्रो मार्गाच्या लगत ५०० मी.पर्यंतच्या क्षेत्रात ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक पर्यंत बांधकामे अनुज्ञेय करावे अशा प्रकारचा नियम समाविष्ट केला आहे. प्रारूप विकास योजना शासनाकडे मंजूरी करिता सादर केलेली आहे. विकास योजनेला शासन स्तरावरून मंजूरी देताना याबाबत उचित निर्णय घेण्यात येईल.
(३) लागू नाही.

---

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे पाडण्याबाबत**

**(४९) ४६०६६ (२०-०१-२०१४). श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे पाडण्याचा आदेश मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ६६ हजार अनधिकृत बांधकामास जबाबदार कोण आहे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका येथे अतिक्रमण विभाग आहे काय,
(३) असल्यास, अतिक्रमण विभागाने आजपर्यंत किती अतिक्रमणे रोखली आहेत व पाडली आहेत,
(४) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील ६६ हजार अनधिकृत बांधकामे नियमित करणेबाबत शासन विचाराधीन आहे काय, याबाबत कोणती कार्यवाही करण्याचे ठरविले आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१६) :** (१) होय, जनहित याचिका क्र. १५१/२०१० व जनहित याचिका क्र. २०७/२०१० मध्ये अनधिकृत बांधकामे पाडण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.
(२) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये अतिक्रमण विभाग आहे.
(३) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण २२०० अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यक्तींविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत व एकूण ६०८ अनधिकृत बांधकामावर आजपर्यंत निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे.
(४) मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही करण्याचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नियोजन आहे.

---

**नानविज (ता.दौंड, जि.पुणे) येथील राज्य राखीव पोलीस दल, गट क्रमांक ५ केंद्राच्या जागेत महाराष्ट्र संगीत केंद्र उभारण्याच्या प्रस्तावास परवानगी देण्याबाबत**

**(५०) ४७७५६ (०३-०२-२०१४) ॲड अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नानविज (ता.दौंड, जि.पुणे) येथील राज्य राखीव पोलीस दल, गट क्रमांक ५ केंद्राच्या तब्बल ४१५ एकर जागेत कोटयवधी रुपये खर्च करुन महाराष्ट्र संगीत केंद्र उभारण्यास परवानगी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोटयवधी रुपये खर्च करुन बांधकाम येणाऱ्या या केंद्राला महाराष्ट्र पोलिसांकडून विरोध करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी कोणता निर्णय घेतला आहे वा येत आहे,

(४) तसेच, पोलीसांचा या प्रस्तावाला विरोध असतानांही वरील ठिकाणी संगीत केंद्र उभारण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१६) :** (१) मौजे नानविज येथे पोलीस दलाची एकूण २३३ एकर जागा असून त्यामध्ये राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्राकरीता १५८ एकर व पोलीस प्रशिक्षण केंद्राकरीता ७५ एकर जागा आहे. महाराष्ट्र पोलीस वाद्यवृंद प्रबोधिनीकरीता प्रशासकीय इमारत व अनुषंगिक इमारतींचे बांधकाम करण्यासाठी रु. ३२.१७ कोटी इतका खर्चाच्या अंदाजपत्रकास पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.